

# तो एक तास...

– डॉ स्नेहा कुलकर्णी

मस्कत ही ओमानची राजधानी. अतिशय स्वच्छ शहर आणि सुंदर किनाऱ्याने नटलेले शहर आहे, येथील सगळीकडची स्वच्छता खरोखर वाखाणण्याजोगी आहे. सहसा आखाती देशात हिरवळ पाहायला मिळणे सुद्धा दुर्लभच. पण येथील सुंदर, रेखीव आणि मोठमोठे बागबगीचे मनाला भुरळ पाडणारे आहेत..

येथील प्रशस्त रस्ते, अतिशय शिस्तबद्धरीत्या होणारी वेगवान वाहतूक आणि रहदारीचे नियम पूर्णपणे पाळणारे नागरिक.... एखादे कल्पनाचित्र वाटेल असेच एकूण वातावरण असते. त्यातही वरचेवर कुठल्या ना कुठल्या निमित्ताने होणारी रोषणाई दिवाळीची आठवण करून देत असते,

मस्कत शहर एका बाजूने समुद्र आणि दुसऱ्या बाजूने डोंगराने वेढलेले असल्याने नयनरम्य समुद्रतट आणि हिलस्टेशनची मजा तुम्ही एकाच वेळी घेत असता. एकूणच मस्कत हे ओमान ची Beauty has an address, Oman ही ओळख सार्थ ठरवत असते. विशेष नमूद करण्यासारखे, म्हणजे इथल्या लोकांच्या पोशाखातील एकसमानता ... स्त्रिया अबाया म्हणजे काळ्या रंगाचे बुरखे वापरतात आणि पुरुष पांढऱ्याशुभ्र रंगाचे पायघोळ पारंपरिक कपडे वापरतात. त्यात कुठल्याही प्रकारचे डिझाईन चालत नाही. हुद्दा कितीही लहान अथवा मोठा असो कपडा मात्र एकसारखाच! शुक्रवारी नमाज पढल्यावर मशिदीतून बाहेर येणारे लोक पाहून पांढऱ्या बलाक मालांची आठवण यावी.

ओमान मध्ये जगण्याची कुठली घाईगडबड नाही. स्वतःचे घोडे पुढे दामटत राहणारे क्वचितच कोणी असतील. सर्वसाधारणपणे 'पहले आप' ह्या लखनवी वृत्तीनं राहणारी माणसे पावलोपावली असल्याने इतर ठिकाणी जाणवणारा ताणतणाव इथे गायब झालेला दिसतो. कुठे रस्त्यावर हमरीतुमरीवर येणं नाही की लूटमारीच्या घटना नाहीत. सगळं काही आलबेल सुरु असतं.

एकूणच येथील नागरिक ओमानची सहिष्णू ओळख जपण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. जणू काही रामराज्यच. ओमान आणि भारत यांचे संबंध खूपच सौहार्दपूर्ण आहेत, आणि इकडे भारतीयांना सहसा कुठला त्रास दिला जात नाही.

पण एवढ्या सुंदर चित्राला गालबोट लागावे अशीही एक घटना इकडे घडली. आजही ती आठवली तर अंगावर शहारे येतात.

एकदा सुट्टीचा दिवस असल्याने आम्ही दुपारी हॉटेलिंग उरकून फिरायला बाहेर निघालो होतो. शुक्रवारची दुपार, बाहेरचे रणरणते ऊन .. त्यामुळे रस्ता सुनसान. मी, माझी मुलगी आणि नवरा Al Bustan रोडने निघालो होतो. हा रस्ता मस्कतच्या जरा बाहेरच असल्याने शुकशुकाट होता. आम्हाला रस्त्यात एक कार थांबलेली दिसली. कदाचित बंद पडलेली असावी, आणि जवळच साठीच्या वयाचा पांढऱ्याशुभ्र वेषातील एक ओमानी भर उन्हात उभा होता.

त्याने आमच्या गाडीला थांबण्यासाठी इशारा केला. बहुधा त्याला काही अडचण असावी. काही मदत करावी ह्या हेतूने आम्ही त्याच्या जवळ जाऊन गाडी थांबवली. आम्ही त्याला काही विचारणार त्याच्या आतच तो गृहस्थ काही न विचारता आमच्या गाडीत शिरला. त्याला अरेबिकशिवाय काहीच येत नव्हतं आणि आम्हाला अरेबिक येत नव्हतं ... संवादाचा प्रश्नच उद्भवत नव्हता. नुसती खूण करून त्याने गाडी पुढे घेऊन चलण्यास सांगितले. कदाचित पुढे त्याचे घर असावे म्हणून आम्ही गाडी पुढे नेत राहिलो. वस्तीमागून वस्ती जात होती पण हा काही उतरण्याचे नाव घेईना. आम्ही बरेच पुढे आलो होतो. आता त्याची अरेबिक बडबड वाढू लागली.. त्याचे हातवारे आणि भेलकांडणे पाहून आम्हाला त्याने दारू घेतल्याचा संशय येऊ लागला. त्याला

गाडीतून उतरायला सांगितले तसा त्याने साफ नकार दिला... उलट संतापल्यासारखं ओरडायला सुरवात केली. त्याचा तो अवतार पाहून माझी मुलगी घाबरूनच गेली आणि रडायला लागली.

आता ह्याला गाडीतून कुठे आणि कसे उतरवावे, हा मोठाच पेचप्रसंग उभा राहिला. रस्ता सुनसान, त्यामुळे मदतीस कुणीच नाही . अखेर जे होईल ते होऊ दे अशा निश्चयाने आम्ही यू टर्न घेतला आणि आलेल्या दिशेने माघारी निघालो. आता तर त्याची बडबड शिगेला पोचली होती. शेवटी दारू पिऊन तर्रर झालेल्या माणसाला काय शुद्ध असायची?

कसेबसे आम्ही एखादी वस्ती दिसेपर्यंत माघारी आलो. तिथे एक इंग्लिश येणारा स्थानिक मिळाला.. त्याला सगळा घडला प्रकार सांगितला.. त्याने बाबापुता करत कसेतरी ह्याला खाली उतरवले. त्याच क्षणी आम्ही कारचे दरवाजे आतून लॉक करून घेतले आणि सुटकेचा निःश्वास सोडला.

नंतर त्या सद्गृहस्थाने आम्हाला समजावून सांगितले की जरी सर्वसामान्य ओमानी लोक सभ्य आणि सुसंस्कृत असले तरी त्यातही बाहेरच्या लोकांना लुबाडणारे काही नग आहेतच. आणि समजा ह्या अनोळखी माणसाला तुमच्या गाडीत काही झाले असते तर ROP (मस्कत चे पोलीस )ला काय समजावणार होता?

आता ह्यापुढे अनोळखी व्यक्तींना गाडीत घ्यायचे नाही हा धडा घेऊन आम्ही तेथून निघालो ते आजतागायत पाळत आहोत. त्यानंतर बरेच दिवस आम्ही त्या रस्त्यावर फिरकलोच नाही, कारण तिथला हा कटु अनुभव लवकर विसरणे शक्यच नव्हते. आता जेव्हा कधी तेथून जातो तेव्हा हा प्रसंग डोळ्यांसमोर जसाच्यातसा उभा राहतो.... तो पांढऱ्या वेशातील ओमानी माणूस, त्याची बंद पडलेली कार, त्याचे बळेच गाडीत येणे आणि  सोबतचा तो एक भयंकर तास ....!

**(मस्कत, ओमान)**

❖❖❖



अलकनंदा साने

डॉ. मनीषा फडके

# दुबई-इंदौर वासियोंका सम्मेलन

गत १ जून को दुबई में  इंदौरवासियों का सम्मेलन आयोजित किया गया. पिछले कई वर्षों से गल्फ में निवास कर रहे, दुबई, अबुधाबी, रासलखेमा, शारजाह आदि स्थानों से आए इंदौरवासियों ने सम्मेलन में शिरकत की. इस प्रथम सम्मेलन में यह तय किया गया कि समय समय पर इंदौरवासी आपस में मिलते रहें, ताकि वक्त जरुरत पर एक दूसरे के काम आ सके. यह भी तय हुआ कि अब त्यौहारों का मौसम नजदीक है, अत: भविष्य में सारे त्यौहार एक साथ मनाये जाने की शुरुआत की जानी चाहिए. यह जानकारी देते हुए सम्मेलन की प्रमुख संयोजक लीना वैद्य ने बताया कि सम्मेलन की तैयारी में अंजू लोहिया, आभा गोयल, सीमा खंडेलवाल एवं शिल्पा अग्रवाल का अतुलनीय सहयोग रहा. साथ ही प्रेम जी ने मीडिया में सारी जानकारी आदि देने का दायित्व बखूबी निभाया. अजयजी ने सहभागियों की सुविधा के लिए व्हाट्सऐप पर समूह बनाया और कार्यक्रम की रुपरेखा बनाना आसान हो गया. उन्होंने नासिर खान का विशेष उल्लेख करते हुए कहा कि रमजान का महीना होते हुए भी वे सपरिवार इस सम्मेलन में शरीक हुए और इस तरह इंदौर के प्रति अपने प्रेमभाव को प्रगट किया. लोहिया जी ने तम्बोला का सुचारू संचालन किया. जीतूभाई वैद्य क्विज के विजेता रहे.

डॉ. मनीषा फडके, संजीव फड़के, श्री एवं श्रीमती अनिल मेहदीरत्ता , समीर, वीणा, राजीव खंडेलवाल, विवेक सक्सेना सपरिवार, डॉ.मेघना जैन, प्रतिक मणियार, श्रीमती सुवीरा, अजय कासलीवाल, सचिन आदि १०० से अधिक लोगों ने सम्मेलन में हिस्सा लिया एवं भविष्य में सम्मेलन में तय किये गए बिंदुओं पर पूर्ण सहयोग के लिए आश्वस्त किया. लीना वैद्य ने कहा कि अगले सम्मेलन में सहभागियों की संख्या ४०० तक पहुँचने की संभावना है.

❖❖❖